बीड । गुरूवार

०५.०६.२०२५

वर्ष : ५ अंक : ६५

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955









# डीवायसी पूजा पवार यांनी रेड मारलेल्या पत्त्याच्या क्लब मधून पैशाला फुटले पाय ?

## • लाखोंचा माल; हजारात खेळ; शहरात चर्चेला उधाण; कोण आहे मास्टरमाइंड?

**बीड । प्रतिनिधी**

प्रशिक्षणार्थी डीवायएसपी पूजा पवार यांची जिल्हाभरात सिंगम कारवाई सुरू आहे. अवैद्य धंद्यांना टार्गेट करत गुन्हेगारांना सळो की पळो करून सोडणाऱ्या पूजा पवार यांच्या नावाची कीर्ती जिल्ह्यात पसरली आहे. पिंपळनेर परिक्षेत्रात अवैध धंदे चालकांनी आपले धंदेच बंद केले असून गुन्हेगार अंडरग्राउंड झाले आहेत. बीड शहरातही अनेक ठिकाणी डी वाय एस पी पूजा पवार यांनी अनेक धडक कारवाई केल्याने मस्तावलेल्या माफियांना पूजा पवार यांच्या नावाची धास्ती बसली आहे. दोन



दिवसांपूर्वी शिवाजीनगर हद्दीतील एका पत्त्याच्या क्लब वर डीवायसी पूजा पवार यांच्या पथकाने झडप घालत जुगारांच्या मुसक्या बांधल्या होत्या. या ठिकाणाहून पंधरा ते वीस जुगारी मुद्देमालासह पकडत शिवाजीनगर पोलीस ठाण्यात बंदिस्त करण्यात आले. रेड मारल्यानंतर पथकाचे काम झाले मात्र या ठिकाणी रोख असलेल्या रकमे संदर्भात शहरात उलट सुलट चर्चा सुरू झाली आहे. या पत्त्याच्या क्लब मध्ये खेळत असलेल्या एका जुगार्याने या ठिकाणी लाखोंची रोकड असताना पोलिसांनी काही हजारात रक्कम दाखवली असल्याचे सांगितले आहे. विशेष म्हणजे या जुगाराच्या शब्दावर विश्वास ठेवणे कितपत योग्य आहे. परंतु अशा अनेक छाप्यामधून खरी रक्कम लपवली जाते व काही ठराविक रक्कम जप्त दाखवली जात असल्याची यापूर्वी अनेक प्रकरणे झाली आहे. यात काही तथ्य असल्यास याची चौकशी होणे आवश्यक आहे. डी वाय एस पी पूजा पवार यांनी केलेल्या कारवाई धडाकेबाज असून त्यांच्या नावाचा वापर करत कोणी मलिदा खाण्याचा प्रयत्न करत आहे का ?

जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्या प्रमुखांना आपल्या भागातील दोन नंबरचे सर्व धंदे बंद करण्याचे सक्तीचे आदेश दिले आहेत. जिल्ह्यातील बहुतेक भागात अवैध धंदे बंद आहेत. काही ठिकाणी लपून छपून असे धंदे होत आहेत मात्र गुप्त माहितीच्या आधारे त्यांच्यावरही कारवाई केली जात आहे. बीड जिल्ह्यात प्रशिक्षणार्थी असलेल्या डीवायएसपी पूजा पवार यांच्या पथकाला जिल्हा पोलीस अधीक्षकांनी पूर्ण ताकद दिली आहे. जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे अधिकार पूजा पवार यांना देण्यात आले आहे. डी वाय एस पी ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड श्री. अंकुश नखाते सर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, करडूले पिंटू, ड. दिपक गायकवाड, पोलीस विठ्ठल काळे, दिपक डोईफोडे, आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

# बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार

## • वीजभाराची विभागणी होणार, 220 के.व्ही लाइनला सबस्टेशन जोडले जाणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर आणि ग्रामीण भागात सध्या सुरू असलेला वीजेचा लपंडाव होत आहे. सतत वीजपुरवठा खंडीत होत असल्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. यावर आता आ.संदीप क्षीरसागरांकडून मार्ग काढला जात आहे. बीड शहर आणि ग्रामीण भागातील वीजेचा भार विभागणी ▶▶ उर्वरित पान २ वर



**• महावितरणसह महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसमवेत आ.क्षीरसागरांनी केली पाहणी**

नवीन २२० के.व्ही. लाइनचे काम सुरू असून प्रगतीपथावर आहे. बुधवारी (दि.४) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी सदरील कामाची प्रत्यक्ष पाहणी केली यावेळी माजी आ.सय्यद सलीम, महावितरण विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

**• असा निघणार पर्यायी मार्ग–** सध्या बीड शहर आणि ग्रामीण भागातील सर्व सबस्टेशन१३२ के.व्ही. च्या लाइनला जोडलेले आहेत. परंतु हा पुरवठा आवश्यक्तेपेक्षा कमी प्रमाणात होत आहे. यावर मार्ग काढण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यातून नवीन २२० के.व्ही. लाईनचे काम सुरू आहे. सध्या हे काम प्रगतीपथावर असून बीड शहरातील माळीवेस, एमआयडीसी, जालना रोड, पांगरी रोड या सबस्टेशनला आणि ग्रामीण भागातील नामलगाव, पेंडगाव, कुक्कडगाव आणि ईट येथील पाणीपुरवठा ही उपकेंद्रे १३२ के.व्ही. लाईनवरून ▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराई तहसिल कार्यालयातील लाचखोर सिपाई चव्हाण ला निलंबित करा : सय्यद महेबुब

**गेवराई । प्रतिनिधी**

तहसील कार्यालय गेवराई येथील लाचखोर सिपाई या पदावर कार्यरत असलेला चव्हाण हा सामान्य लोकांचे कामात अडथळा निर्माण करुन पैश्याची मागणी करत आहे. जिल्हाधिकारी यांनी तात्काळ लाचखोर सिपाई चव्हाण यांला निलंबित करावे अशि मागणी समाजसेवक सय्यद महेबुब यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केली आहे.

सविस्तर असे की दि ०४ रोजी शहरातील काहि लोक कलम १०७ च्या जामीन संदर्भात तहसील कार्यालय गेवराई येथे आले होते. सदर प्रकरणातील लोक हे वेळापासुन लाचखोर सिपाई चव्हाण याची वाट पाहत तहसील कार्यालयात बसलेले होते. चव्हाण यांनी जाणिव पुर्वक त्यांना बसुन ठेवले व त्यानंतर त्यांना पैश्याची मागणी केली होती.

यापूर्वी देखील चव्हाण यांनी गोर गरीब लोकांना काम अडवून वारंवार पैसे ची मागणी करतो.सर्व सामान्य लोकांचे कामे अडवून पैश्याची मागणी करतो.असे अनेक प्रकार चव्हाण यांचे आहे. लाचखोर सिपाई चव्हाण सारखेच काहि अजुन तहसिल कार्यालय गेवराई येथील कर्मचारी ▶▶ उर्वरित पान २ वर



# बीड शहरातील मोस्ट वॉन्टेड गुंड तडीपार !

## • पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची कारवाई




**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा खंबीरपणे सांभाळत आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही ▶▶ उर्वरित पान २ वर






### कारच्या धडकेत माजी उपसभातीचा जागीच मृत्यू



**केज । प्रतिनिधी**

भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवरील केज पंचायत समितीचे माजी ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात १५० कोटी रुपयाच्या शासकीय इमारतीच्या कामाची ई–निविदा मॅनेज

## • अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता यांचे कामाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष चौकशी करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

विनायक कन्स्ट्रक्शन आंबेजोगाई यांना बीडमधील प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, महसूल विभागाचे निवासस्थान, जिल्हा रुग्णालय इमारत यासह विविध कामे मिळवली आहेत. ही कामे मिळविताना अक्षरशः मोठी–मोठ्या अभियंत्यासोबत आर्थिक तडजोड करत ई–निविदा मॅनेज करत हजारो कोटीची कामे मिळवली आहेत. ई–निविदा प्रक्रिया मॅनेज केल्याचा आरोप वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सर्व शासकीय कार्यालयाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय मान्यता ई–निविदा प्रणालीची माहिती मागवली होती परंतु या ठिकाणी उपअभियंता तथा जन माहिती अधिकारी या पदावर काम करणारे बोराडे यांनी सदर माहिती देण्यासाठी स्पष्ट नकार दिला आहे. जेव्हा काम पूर्ण होईल तेव्हा तुम्हाला माहिती देऊ असंही कळविले आहे. इमारतीचे कामकाज काम करत असताना कामाच्या आजूबाजूला कुंपण लावले आहे तसेच त्या ठिकाणी नूतन इमारतीचे बांधकाम कशा पद्धतीने चालू आहे हे पाहण्यास गेले असता त्या ठिकाणी ओळखीचे पोलीस कर्मचारी बोलविले जातात तसेच गार्ड यांना हाणामारी करण्याचे अधिकार दिले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता उपअभियंता लिपिक, लेखाधिकारी गेल्या अनेक वर्षापासून एकाच ▶▶ उर्वरित पान २ वर

**• मा.मंत्री धनंजय मुंडे यांचा वरदहस्तामुळे ई–निविदा मॅनेज**

**विनायक कन्स्ट्रक्शनचे मनोज गित्ते यांच्यावर माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा वरदस्त आहे त्यांच्यावर वरदहास्तामुळेच बीड शहरांमधील शासकीय कार्यालयाच्या नूतन इमारतीचे १५० कोटीचे कामे ई–निविदा मॅनेज करत मिळवली आहेत. या ठिकाणी मंत्री असताना दबावाचा वापर अधिकाऱ्यांवर केला असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केला आहे सुरू असलेल्या प्रत्येक कामे मुदतीत पूर्ण होत आहेत का ? गुणवत्ता तपासणी दबावात पूर्ण केली आहे का ? याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. – अजय सरवदे (जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड)**

### कंटेनरने दुचाकी स्वरास उडवले

**एकाचा जागीच मृत्यू; कोळवाडी येथील घटना**



**बीड । प्रतिनिधी**

बीड पासून जवळ असलेल्या मांजरसुंबा घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या कोळवाडी येथे दुचाकीला एका कंटेनरने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी सकाळी घडली. मिळालेल्या माहिती नुसार, शेख अथर शेख दाऊद (वय ४७, रा. मोहम्मदिया कॉलनी, बीड) हे मांजरसुंबा कडून बीडकडे मोटरसायकलने (क्रमांक MH23 H 9986) येत असताना, कोळवाडी गावाजवळ मागून भरधाव ▶▶ उर्वरित पान २ वर

# जागतिक पर्यावरण दिन : जीवनाचा श्वास वाचवण्याची गरज - तहसीलदार शेळके

प्रत्येक वर्षी ५ जून हा दिवस ‘ जागतिक पर्यावरण दिन ’ म्हणून साजरा केला जातो . १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण परिषदेमध्ये या दिवसाची सुरुवात झाली आणि तेव्हापासून संपूर्ण जगभर पर्यावरण रक्षणाबाबत जनजागृती करण्याचा हेतू घेऊन हा दिवस साजरा केला जातो . यावर्षीही या दिवसाचे महत्त्व अधिकच वाढले आहे , कारण आपल्या भोवतालचे पर्यावरण दिवसेंदिवस धोक्यात येत चालले आहे . निसर्गाच्या विविध रूपांना जपणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून ती आपली वैयक्तिक जबाबदारी आहे, हे आता सर्वांनी ओळखले पाहिजे .

पर्यावरण म्हणजे काय :- याचा अर्थ केवळ झाडेझुडपे किंवा प्राणी-पक्षी एवढाच मर्यादित नाही . पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालचा सजीव आणि निर्जीव सृष्टीचा समन्वय - यात जमिन , पाणी , हवा , तापमान , जंगल , सागरे , प्राणी , मानव आणि त्यांची परस्परसंबंधित जीवनशैली येते . या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून पृथ्वीवरील जीवन शक्य झाले आहे . आपले शरीर , श्वास , अन्न , पाणी , सर्व काही या पर्यावरणावर अवलंबून आहे . त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे म्हणजे आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे होय . मात्र मागील काही दशकांत औद्योगिक क्रांती , लोकसंख्या वाढ , आणि अनियंत्रित शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास वेगाने होत आहे . हवामान बदल , वाढते प्रदूषण , वनोत्पादन , जलस्रोतांचे आटणे , जैवविविधतेचा नाश , मृदा खालावणे, आणि प्रदूषित अन्न व पाण्यामुळे वाढणारे आरोग्यविषयक प्रश्न यामुळे मानवाची जीवनशैलीच संकटात आली आहे . हवामान बदलामुळे आज अनियमित पावसाचे प्रमाण वाढले आहे , काही ठिकाणी अतिवृष्टी तर काही ठिकाणी दुष्काळ यामुळे शेतीवर मोठा परिणाम होतो आहे . परिणामी , अन्नधान्याचे उत्पादन घटले आहे आणि शेतकऱ्यांचे जीवन अधिक अडचणीत गेले आहे . तसेच , हवेत




वाढणारे कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे . यामुळे हिमनग वितळत असून समुद्रसपाटी वाढते आहे , ज्यामुळे किनारी भागांमध्ये पूर आणि जमीन गिळंकृत होण्याचे प्रमाणही वाढले आहे . आपण दैनंदिन जीवनात अनेक अशा सवयी जोपासतो ज्या पर्यावरणासाठी घातक ठरतात . उदाहरणार्थ , प्लास्टिकचा अतिरेक , विजेचा आणि पाण्याचा अपव्यय , खाजगी वाहतुकीचा अत्याधिक वापर , कचऱ्याची अनियंत्रित विल्हेवाट , आणि जंगल भागांत बिनदिक्कत हस्तक्षेप . ही सगळी उदाहरणे दाखवून देतात की आपण आपल्याच हाताने आपल्या जीवनासाठी आवश्यक अशा नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास करत आहोत . आधुनिकतेच्या नावे आपण शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाला इतके महत्त्व दिले की त्याचा थेट फटका पर्यावरणाला बसू लागला आहे . शहरांतील गर्दी , उष्णता , ध्वनीप्रदूषण , आणि श्वसनास त्रासदायक वायू यामुळे माणसाचे आरोग्य धोक्यात आले आहे . लहान मुलांमध्ये वाढणारे दमा , ऍलर्जी , त्वचाविकार , तसेच वृद्धांमध्ये वाढणारे हृदयरोग आणि कर्करोग याला बऱ्याच अंशी प्रदूषण जबाबदार आहे . या साऱ्या समस्यांचा मुकाबला करण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी धोरणात्मक पातळीवर प्रयत्न करणं गरजेचं आहेच, पण त्याचबरोबर सामान्य नागरिक म्हणून आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनशैलीत काही सकारात्मक बदल करणेही तितकेच आवश्यक आहे . आपली सवय म्हणजेच आपले पर्यावरण - हे तत्त्व लक्षात घेऊन आपल्याला नैसर्गिक संसाधनांचा वापर जपून करावा लागेल . यासाठी सुरुवात आपल्या घरापासूनच होऊ शकते . उदा . दिवसभर चालू असलेले पंखे , टीव्ही , वॉटर प्युरिफायर , किंवा वापरल्यानंतरही बंद न केलेले लाईट्स - हे सर्व वीजेचा अपव्यय करतात . वीज निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कोळसा वापरला जातो जो पर्यावरणासाठी घातक आहे . म्हणूनच वीजेचा वापर आवश्यकतेपुरता आणि जबाबदारीने करणे गरजेचे आहे . त्याचप्रमाणे , घरात नळ उघडा ठेवून दात घासणे किंवा भांडी घासताना सतत पाणी वाहू देणे , यामुळे दरवर्षी लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होतो . ही छोटीशी सवय बदलल्यास मोठा फरक पडू शकतो . वाहतुकीच्या साधनांमध्ये शक्य असल्यास सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा . दुचाकी किंवा चारचाकी ऐवजी सायकल किंवा चालत जाण्याची सवय लावल्यास आरोग्यही सुधारते आणि प्रदूषणही कमी होते . प्लास्टिकचा वापर टाळणे , पुनर्वापराचे साहित्य वापरणे , कंपोस्टिंगसाठी ओला कचरा वेगळा करणे , तसेच इको-फ्रेंडली उत्पादनांची निवड करणे हेही दैनंदिन जीवनात सहज शक्य आहे . आपल्या घरातील टेरेसवर , गॅलरीत किंवा छोट्याशा अंगणात झाडे लावणे , शहरांमध्ये शालेय किंवा सोसायटी स्तरावर वृक्षारोपण करणे , हे पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरते .

वृक्षतोड थांबवण्यासाठी आणि हरित क्षेत्र वाढवण्यासाठी प्रत्येकाने दरवर्षी निदान एक तरी झाड लावण्याचा संकल्प केला तर हजारो हेक्टर क्षेत्रात पुन्हा निसर्ग फुलवता येईल . आपल्याला वारंवार सांगितले जाते की झाडे लावा, झाडे जगवा , पण प्रत्यक्षात अनेकजण हे विसरतात की झाडे ही केवळ छायेसाठी किंवा सौंदर्यासाठी नाहीत , ती आपले शुद्ध प्राणवायू तयार करणारे कारखाने आहेत . एक झाड वर्षभरात सुमारे १.४ टन कार्बन डायऑक्साइड शोषून घेतं आणि शुद्ध हवा निर्माण करत . ही माहिती आपल्या कृतीत बदलवणे आजच्या काळात अत्यावश्यक आहे .

आपण खरेदी करताना कोणती उत्पादने निवडतो, यावरही पर्यावरणाचा परिणाम होतो . जास्तीत जास्त स्थानिक आणि नैसर्गिक उत्पादने वापरणे , उगमस्थानी उत्पादन घेतलेली फळे-भाज्या वापरणे , प्रक्रिया न केलेली आणि कमी पॅकेजिंग असलेली उत्पादने निवडणे यामुळे ऊर्जा आणि प्रदूषण दोन्ही घटते . बाजारात पर्यावरणपूरक साबण , डिटर्जंट , पॅकेजिंग साहित्य यांची संख्या वाढली आहे . आपल्या खरेदीतून आपण कोणत्या उत्पादकाचे समर्थन करतो , हे आपल्या पर्यावरणविषयक जागरूकतेचे द्योतक ठरते . शालेय शिक्षणातही पर्यावरण शिक्षण हा महत्त्वाचा भाग व्हायला हवा . लहान वयातच मुलांमध्ये निसर्गप्रेम, संवेदनशीलता आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली तर ती पिढी भविष्यात पर्यावरणविषयक अधिक सजग आणि कृतीशील असेल . त्यासाठी शाळांमध्ये शाश्वत जीवनशैलीविषयी मार्गदर्शन , प्रकल्प कार्य , भटकंती , वृक्षारोपण , निसर्ग निरीक्षण यांसारखे कार्यक्रम नियमित राबवणे गरजेचे आहे .

तांत्रिक प्रगती ही मान्य असली तरी ती निसर्गाच्या संहाराच्या किंमतीवर नको . पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची निवड , सौरऊर्जा , पवनऊर्जा , जलसंवर्धन , पर्जन्यसंवर्धन , वनीकरण या क्षेत्रात शासनाने व स्वयंसेवी संस्थांनी अधिक लक्ष देणे आवश्यक आहे . सामान्य माणसाला या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सुलभ मार्ग उपलब्ध करून दिले पाहिजेत . गावपातळीवर जलसंधारण आणि गवत लागवड यांसारखे काम अधिक ठोस पद्धतीने व प्रोत्साहनाने राबवले पाहिजे .

‘ जागतिक पर्यावरण दिन ’ हे केवळ एकदाच साजरे करायचे औपचारिक सोहळा नसून , ते एक स्मरण आहे - की पृथ्वी ही आपली एकमेव वसाहत आहे , तिचे संरक्षण करणे ही आपली एकत्रित जबाबदारी आहे . पर्यावरण संकट ही आता कल्पनारम्य बाब नाही , तर ती एक वास्तव आहे जी आपल्याला दररोज जाणवते आहे . ही अटळ परिस्थिती उलटवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जागरूकता आणि कृती यांचं संतुलन राखत जीवनशैलीमध्ये शाश्वततेचा मार्ग स्वीकारणे अत्यावश्यक आहे .

आज जर आपण पर्यावरणाकडे दुर्लक्ष करू, तर उद्या पृथ्वी आपल्याला दुर्लक्षित करेल . म्हणून , ५ जूनच्या निमित्ताने फक्त घोषणांची व भाषणांची वारे वाहू नयेत , तर त्या जागृतीतून कृतीकडे वळून आपण पर्यावरणरक्षणासाठी तातडीने एक पाऊल पुढे टाकलं पाहिजे . निसर्ग आपला आहे , पण तो आपला मित्र म्हणून राहील की शत्रू याचा निर्णय आपण आपल्या वर्तनाने ठरवणार आहोत .

**- चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके,**
**तहसीलदार , बीड**

## पान १ वरून पुढे...

### डीवायसी पूजा...

पूजा पवार यांनीही जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिलेली जबाबदारी सार्थक ठरवत असताना बीड शहरात एका जंगल परिसरात खुलेआम पणे सुरू असलेल्या पत्त्याच्या क्लबवर थेट गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करण्यात आली. यामध्ये तब्बल १५ ते २० जुगारी पकडले गेले. कारवाई करण्यात आली मात्र यानंतर मुद्देमाल हस्तगत करण्याच्या हालचालींना वेग आला दुचाकी जप्त तर मोबाईल परत करण्यात आले तसेच या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोकड असल्याची माहिती मिळाली असून पोलिसांनी जप्त केलेली रक्कम व दाखवलेल्या रकमेत मोठा फरक असल्याचे एका जुगार्‍याकडून कळाले आहे. विशेष म्हणजे डीवायएसपी पूजा पवार यांनी शिवाजीनगर पोलिसांना आरोपी व मुद्देमाल हवाली केला यानंतर काय झाले याची माहिती पवार मॅडम यांना आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत असून पोलिसांच्या धडाकेबाज कारवाईला सलामच मात्र अंधारातून मुद्देमाल लंपास करणारे ते मास्टर माईंड कोण याचाही शोध लागणे आवश्यक आहे. पत्त्यांचे क्लब व अनेक जुगाराच्या ठिकाणी पोलिसांनी कारवाई केल्यानंतर या ठिकाणी असलेला मुद्देमाल अनेक वेळा चर्चेचा विषय ठरतो.

### बीड शहर...

म्हणजेच डिव्हाइड करून नागरिकांच्या मोठ्या समस्येवर पर्याय काढला जाणार आहे. मागील काही महिन्यांपासून बीड शहर आणि ग्रामीण भागात सातत्याने विद्युतपुरवठा खंडीत होत आहे. सतत होत असलेल्या वीजेच्या लपंडावामुळे नागरिक हैराण झाले आहेत. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांनी या महत्त्वाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी वीजेचा भार विभागण्याचा पर्यायी मार्ग काढला आहे.

**● असा निघणार ...**

लवकरच नवीन २२० के.व्ही. लाईनला जोडली जाणार आहेत. त्यामुळे बीड शहर आणि ग्रामीण भागात आवश्यक्तेनुसार मुबलक प्रमाणात वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बीडमधील नागरिकांच्या वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे.

### गेवराई तहसिल...

पैश्यासाठी गोर गरीब लोकांचे अडवतात. त्यामुळे मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी चव्हाण याला तात्काळ निलंबित करावे व तसेच तहसील कार्यालय गेवराई अढावा बैठक घेऊन सर्व सामान्य लोकांची होणारी अडवणुक थांबवावी अशि मागणी समाजसेवक सय्यद महेबुब यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केली आहे.

### बीड शहरातील...

करण्याचे योजिले आहे. त्या अनुषघांने पोनि पो.स्टे. पेठ बीड यांनी दिनांक १३.०५.२०२५ रोजी इसम नामे शेख नवीद शेख चाँद वय २७ वर्षे रा. जामा मज्जीद जवळ, मोमीनपुरा बीड ता. जि.बीड याचे विरुद्ध चझऊकायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव २ अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता. सदर स्थानबध्द इसमाविरुध्द पो. ठा. पेठ बीड येथे घराविषयी आगळीक करणे, विनयभंग करणे, ओळखीचा फायदा घेऊन लुटणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे, दंगा करणे, गंभीर दुखापत करणे, रस्ता आडविणे, पुरावा नष्ट करणे, अवैध शस्त्र बाळगणे, जमाबंदी आदेशाचे उल्लंघनकरणे, बाल लैंगिक अत्याचार करणे, फौजदारी कट रचने, आजीवन कारवासच्या शिक्षेस पात्र असलेले अपराध करणे, जादुटोण प्रतिबंधक कायदयाचे उल्लंघन करणे, फसवणूक करणे, बनावटी करणी करणे या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०७ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदरील इसम हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने पेठ बीड पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजर होती. तसेच सदर इसमाने आपले वर्तन सुधारावे य यापुर्वी कलम १२९ इछ्डड प्रमाणे दि. ०२.०९.२०२४ रोजी त्याचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गंभीर गुन्हे करण्याचे चालुच ठेवुन होता. त्याची बीड शहरात व पेठ बीड परीसरात प्रचंड दहशत आहे. अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत. त्रास देवुन दहशत निर्माण करुन गुन्हे आ होता. सदर प्रकरणात विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ०३/०६/२०२५ सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड चैं ळपर्षेीरलळ२प राहावी हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्मुल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पोनि पेठ बीड व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो. नि. पेठ बीड यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक ०३.०६.२०२५ रोजी २३.२२ वा. बीड शहरात कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दि. ०४.०६.२०२५ रोजी ०४.१५ वा. हजर करुन स्थानबध्द केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपोअ अंबाजोगाई सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. शिवाजी बंटेवाड स्थागुशा बीड, पो.नि. अशोक मुदीराज, पोउपनि मन्सुर शाह, पोह/सुभाष मोठे, नितेश माने, अश्पाक शेख, अल्ताफ शेख, अजीत शिकेतोड सर्व पो.स्टे. पेठ बीड यांचेसह, सपोउपनि अभिमन्यु औताडे, बिबीषण चव्हाण नेमणुक वाचक/स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणार वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त चझऊ कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.

### कारच्या धडकेत...

उपसभापती नारायण कुंडलिक घुले वय (७५ वर्ष) यांचा डोक्याला जबर मार लागून जागीच मृत्यू झाल्याची घटना केज - मांजरसुंबा रस्त्यावरील मधुबन हॉटेल जवळ मंगळवारी दि. ३ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास घडली. टाकळी ता. केज येथील पंचायत समितीचे माजी उपसभापती नारायण कुंडलिक घुले वय (७५ वर्ष) हे मंगळवारी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास शहरापासून जवळच असलेल्या बीएसएनएल कार्यालयाच्या परिसरातील त्यांच्या घराहून दुचाकीवर शहराकडे निघाले होते. त्यांची दुचाकी ही केज - मांजरसुंबा रस्त्यावर आली असता मांजरसुंब्याकडून भरधाव वेगात आलेल्या कारने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या झालेल्या अपघातात दुचाकीवरील नारायण घुले यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांना उपचारासाठी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, कार चालक कारसह फरार झाला असून कारचा नंबर शोधण्यात पोलिसांना यश आले असल्याचे समजते. दरम्यान माजी उपसभापती नारायण घुले मृतदेह केज येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या शवागृहात ठेवण्यात आला असून बुधवारी सकाळी ११:०० वा. शवविच्छेदन झाल्या नंतर त्यांच्या पार्थिवावर टाकळी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पाच मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### बीड जिल्ह्यात...

जागेवर काम करत असल्याने तडजोड घडवून आणतात त्यामुळे भ्रष्टाचाराला खत पाणी मिळत जाते. सदर प्रकरणी अजय सरवदे यांनी मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे प्रत्येक कामाची चौकशी करत अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ छत्रपती संभाजी नगर यांच्याकडून कामाची सखोल चौकशी करत कामाची गुणवत्ता तपासणी करावी अशी मागणी केली आहे.

### कंटेनरने दुचाकी...

वेगाने येणाऱ्या कंटेनरने त्यांच्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात शेख अथर यांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अपघातानंतर घटनास्थळी ग्रामीण पोलीस दाखल झाले असून, मृतदेह उच्चस्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. दरम्यान, कंटेनरला सह चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास ग्रामीण पोलीस ठाणे करत आहेत.

## पान ४ वरून पुढे...

### जिल्हा वाहतुक....

उड्डाणपुल, एकमिनार चौक येथे विविध कलमांतर्गत लायसन्स नसणे, विमा नसणे, काळी काच, नो पार्किंग, ट्रिपलसीट या सदराखाली एकुण ९५ केसेस व दंड ६६ हजार रुपये करण्यात आला व रोख ६ हजार ८०० रुपये दंड वसुल केला. या दरम्यान पोलीस स्टेशन गंगाखेड गु.र.नं.४५/२४ कलम ३७९ अंतर्गत चोरीस गेलेली मोटारसायकल क्र.एम.एच.२२ बीबी ३२६१ हे वाहन आरोपी नामे शेख मोहम्मद शेख नबीसाब बागवान,रा.वैजवाडी, ता.परळी सह पकडली व पोलीस स्टेशन संभाजीनगर यांच्या स्वाधीन केले.

### बीड बायपास ...

बळीराम पांडू राठोड (वय ४०) व सुमनबाई बळीराम राठोड (वय ३८) राहणार राजपिंपरी (ता. गेवराई, जि. बीड) येथील रहिवासी आहे बळीराम राठोड आणि त्यांची पत्नी सुमनबाई हे अंतरवन पिंपरी तांडा येथे एका लग्नासाठी गेले होते. लग्नाची समारंभ आटोपून ते मोटारसायकलवरून परत येत असताना बीड बायपास रोडवर भरधाव वेगात असलेल्या एका चार चाकी वाहनाने त्यांना पाठीमागून धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली व संबंधित पोलिसांना कळवले. अपघाताची नोंद घेण्यात आली असून,मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात बीड येथे पाठवण्यात आला आहे. राठोड दांपत्याचा अपघातात मृत्यू झाल्याची वार्ता गावात कळताच राज पिंपरी येथील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली . या घटनेचा तपास पोलीस करत असून दुचाकी वाहनाने प्रवास करणे जीवावर बेतले.

### रिलायन्स जनरल...

तक्रार दाखल करुन विमा कंपनीस नोटीस दिली. सदरील नोटीस मिळाल्यानंतर विमा कंपनी हजर राहिली नाही परंतू बँकेने हजर होवून आपले म्हणणे मांडले तसेच विमा कंपनीविरुध्द एकतर्फी आदेश पारित करण्यात आला.

सदरील प्रकरणाची सुनावणी होवून ॲड.बी.डी.सारडा यांनी तक्रारदाराची बाजू भक्कमपणे मांडल्यामुळे आयोगाने सदरील तक्रार मान्य करुन विमा कंपनीला ५ लाख ६४ हजार रुपये नुकसान भरपाई तसेच तक्रारीचा खर्च व मानसिक व शारिरीक त्रासापोटी ५० हजार रुपये मुदतीत देण्याचे सांगितले तसेच तक्रार दाखल दिनांकापासून त्यावर द.सा.द.शे.८% दराने व्याज देण्याचे आदेशित केले आहे.

### रनविर पंडित...

घेण्यासाठी व तबियतीची चौकशी करण्यासाठी रनविर पंडित यांनी दवाखाण्यात जावुन भेट घेतली. भेटी वेळी योग्य मदत तेजशच्या तबेयती साठी देण्याची कबुली विश्वनाथ शरणांगत यांना देण्यात आली. याच प्रसंगी काकु नाना हॉस्पीटलचे संचालक डॉ. आळणे यांनी रनविर पंडित यांचे स्वागत सत्कार केले.व रुग्नाच्या विषयी चर्चा रनविर पंडित व डॉ.आळणे यांच्यामध्ये चर्चा करण्यात आली. या प्रसंगी रामपुरी येथील युवा नेतत्व सुभाष पवार, पिंन्नु देवकुळे,देशमुख व आन्य कार्यकर्ते रनविर काका यांच्या बरोबर उपस्थीत होते.

### शिवसेना जिल्हाप्रमुख...

शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे युवा सेना उप तालुकाप्रमुख रामेश्वर काशीद किशोर झिंजुर्के मुन्ना बाहेती आधी उपस्थित होते

### उज्जोत प्रीमियर...

बोलतांना विद्यार्थ्यांनी विविध खेळ खेळले पाहिजेत आणि शारीरिक तंदुरूस्ती ठेवली पाहिजे असे प्रतिपादन केले. क्रीडा शिक्षक रमण सोनवलकर यांनी विद्यार्थ्यांनी शारीरिक कसरत असणारे खेळ खेळून शारीरिक तंदुरूस्ती वाढवली पाहिजे असे वक्तव्य केले. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक युवा नेते संकेत मोदी तर द्वितीय पारितोषिक सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश इंगोले यांच्या वतीने देण्यात आले होते. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रोख रक्कम रूपये तीस हजार व चॅम्पियन ट्रॉफी अजिंक्य क्रिकेट क्लब तर द्वितीय पारितोषक रोख रक्कम पंधरा हजार व चॅम्पियन ट्रॉफी लीगल ईगल क्रिकेट क्लब या संघांना देण्यात आली. अजिंक्य क्रिकेट क्लबचे कर्णधार पियुष गुळभिले तर लिगल ईगल संघाचे कर्णधार ॲड.अजित लोमटे यांनी संघाच्या वतीने हे पारितोषक स्विकारले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन उफाडे व सूत्रसंचालन अनंत कांबळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार ॲड.बिंबीसार वाघमारे यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रा.अनंत कांबळे, शुभम चौधरी, साकेब पटेल, कुणाल लोमटे, बाळासाहेब गोरे, सचिन गुळभिले, भीमाशंकर शिंदे, समरजित देशमुख, विजय उपाडे, धम्मानंद वैद्य, बुद्धभूषण भडके, पियुष गुळभिले, प्रीतम मांदळे, संघर्ष इंगळे, धम्मपाल जाधव, अद्वैत देशपांडे, ऋषी माने, विक्रमसेन आगळे, सचिन उपाडे, विश्वजीत हंडीबाग, चेतन रोमन, चेतन माने, ॲड बिंबीसार वाघमारे, ॲड.सौरभ चौधरी, निलेश देशमुख, ज्योतीराम परळकर, अजय वडचकर, आनंद मुसळे, अशोक खाडे, राज शिंदे, ऋषी काटुळे, पवन खरात, मुन्ना गडदे, नरेश चव्हाण, जगन्नाथ पाटुळे, महादेव शेप, अमोल गोचडे, ॲड.पृथ्वीराज कदम, ॲड.राजकुमार चौरे, ॲड.अक्षय कामळे, खुशाल परदेशी, नितीन मुंडे, सचिन मुंडे, निहाल शेख, ऋषिकेश कदम यांनी परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या कार्यपध्दती व कार्यक्षमतेबाबत विधानभवनात बैठक



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या कार्यपध्दती व कार्यक्षमतेबाबत उप सभापती कार्यालय, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या तर्फे संवाद बैठक विधानभवनात आयोजित करण्यात आली होती.

विधान परिषदेच्या सन्माननीय उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज विधानभवनात महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई व महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या तर्फे संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस महिला व बालविकास मंत्री श्रीमती आदितीताई तटकरे, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, आमदार चित्रा वाघ, आमदार प्रज्ञा सातव यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीला श्रीमती सुशिबेन शाह, महिला आयोगाच्या सचिव नंदिनी आवडे, सदस्य अँड. संगिता चव्हाण, उत्कर्षा रुपवते तसेच कला शिंदे, शीतल म्हात्रे यांची उपस्थिती होती तसेच विविध पक्षाच्या महिला प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्त्यांसह महिला आयोगाचे अधिकारी उपस्थित होते.या बैठकीत राज्य महिला आयोगाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. राज्य महिला आयोगाचे कामकाज अधिक प्रभावीपणे करण्यासाठी काही सूचना या बैठकीत करण्यात आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने ऊसतोड कामगार महिलांचे प्रश्न, महाराष्ट्र राज्य महिला आयोगासाठी पूर्णवेळ भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी सदस्य सचिव नियुक्त करणे. आयोगाला मिळणाऱ्या निधीमध्ये भरीव वाढ करणे. आयोगाची कर्मचारी क्षमता वाढवणे. विभागीय कार्यालयांना बळ देणे. महिलांच्या प्रश्नासाठी जनजागृती करणे, पीडितांना लवकरात लवकर कशी सहाय्यता मिळेल त्याची अंमलबजावणी करणे या सारख्या सूचनांचा समावेश होता.

बैठकीच्या शेवटी विधान परिषदेच्या सन्माननीय उप सभापती यांनी आलेल्या सूचनांचा आढावा घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यासाठी आणि लवकर अंमलबजावणी करण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना आयोगाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. महाराष्ट्र राज्य महिला आयोगातर्फे आभार मानून ही बैठकीचा समारोप करण्यात आला.

## परभणी जिल्हा महसूल कर्मचाऱ्यांच्या बदलीबाबत विकल्प विचारात घेऊन कार्यवाही : जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी जिल्हा महसूल आस्थापनेवरील सर्व संवर्गातील बदलीपात्र कर्मचारी यांनी दिलेले बहुतांश विकल्प विचारात घेऊनच बदल्यांची कार्यवाही करण्यात आलेली आहे. याबाबत तलाठी व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले आहे, असे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी स्पष्ट केले आहे.



परभणी जिल्हा महसूल आस्थापनेवरील सहायक महसूल अधिकारी (अव्वल कारकुन), महसूल सहायक, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व वाहन चालक यांच्या प्रशासकीय बदल्या-२०२५ च्या अनुषंगाने दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी बदलीपात्र कर्मचारी यांची यादया प्रसिध्द करून बदलीपात्र कर्मचारी यांच्याकडुन दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत शासन निर्णय दिनांक ९ एप्रिल २०१८ अन्वये विकल्प सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.नियतकालीक बदल्यासाठी नागरी सेवा मंडळाची रचना करण्यात आली असून त्यामध्ये नियतकालीक बदल्या-२०२५ करीता नागरी सेवा मंडळामध्ये अपर जिल्हाधिकारी अध्यक्ष, उपजिल्हाधिकारी पुर्नवसन सदस्य व निवासी उपजिल्हाधिकारी सदस्य सचिव आहेत. सदर नागरी सेवा मंडळाच्या बैठकीमध्ये बदलीपात्र कर्मचारी यांनी सादर केलेले विकल्प व विनंती अर्ज हे दिनांक २२ मे २०२५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत ठेवण्यात आले. सदर नागरी सेवा मंडळाने बदलीपात्र कर्मचारी यांनी सादर केलेले विकल्प प्राधान्याने विचारात घेतले. तसेच काही कर्मचा-यांचे बाबतीत त्यांनी सादर केलेले विकल्प रिक्त पदाचे अभावी विचारात घेता आले नाहीत, अशा कर्मचा-यांचे बाबतीत प्रशासनाची निकड लक्षात घेवुन बदल्या करण्यात आल्या आहेत.तसेच तालुक्यांची भौगोलिक परिस्थिती, रिक्त पदांची संख्या, कर्मचारी यांनी बदलीसाठी दिलेले विकल्प विचारात घेण्यात आलेल्या आहेत.

## 'पोफळा' ठरले मराठवाड्यातील पहिले सौरऊर्जा ग्राम

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचा एक आयाम शून्य कार्बन उत्सर्जन हा ही आहे. त्यासाठी अपारंपारिक ऊर्जेचा वापर अधिकाधिक होणे आवश्यक आहे. शासन त्यास चालना देत आहेच. ह्या संकल्पनेचे महत्त्व जाणून आजच कृतिशील पावले उचलणाऱ्या संस्थाही आहेत. त्यापैकीच एक एन्ड्युरन्स टेक्नॉलॉजीस लि. या संस्थेने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीचा विनियोग करुन फुलंब्री तालुक्यातील पोफळा हे गाव संपूर्ण सौरग्राम केले आहे. संपूर्ण गाव सौर ऊर्जाद्वारे आपली विजेची गरज भागवीत आहे. असे हे मराठवाड्यातील



पहिलेच गाव ठरले आहे.

पोफळा ता. फुलंब्री हे तसे लहानसे पण जरासे न्यारे गाव. गावात अवघा ७७ उंबरठा. पण समुद्रसपाटीपासून ७२५ मिटर उंचावर. एन्ड्युरन्स टेक्नॉलीजी या कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून हे गाव संपूर्ण सौर ऊर्जेवर आणण्याचे ठरवले. त्यासाठी महावितरणने त्यांना सहयोग दिला. महावितरणने ह्या गावाचा अधिभार नियमित करण्यासाठी १०० केव्हीचे रोहित्र बसवून दिले. त्यामुळे वीज पुरवठा पुर्णवेळ सुरु राहू शकतो.

गावाने एक होऊन संपूर्ण वीज चोरी बंद केली. त्यानंतर ग्रीड पुरवठा पद्धतीने प्रत्येक घरावर १ केव्ही क्षमतेचे सौर पॅनेल बसविण्यात आले. त्यासाठी प्रति पॅनेल, फिटींग, मिटर बसविणे असा प्रत्येक कुटुंबासाठी ५१ हजार रुपयांचा खर्च कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून केला. एप्रिल महिन्यापासून संपूर्ण गाव हे सौर ऊर्जेवर शिफ्ट झाले, अशी माहिती एन्ड्युरन्सच्या सामाजिक उपक्रम विभागाचे सहा. व्यवस्थापक उदय दुधगावकर यांनी दिली. या शिवाय गावातील शाळा, जलसंधारण, वृक्ष लागवड अशी इतर कामेही या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून झाली आहेत.

## आपत्तीमध्ये नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी काम करावे - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

आपत्तीमध्ये जीवित व वित्त हानी सोबतच पायाभूत सोयी - सुविधांचे होणारे नुकसान कमी करण्यासाठी प्रयत्न करावीत. आपत्तीमध्ये सामान्य नागरिकांचे जीवन सुसह्य व्हावे, त्यांना आपत्तीची झळ बसू नये यासाठी आपत्ती व्यवस्थापनात दर्जेदार काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. त्याचबरोबर आपत्ती व्यवस्थापनाचा निधी सौम्यीकरण कामासाठी खर्च व्हावा. तसेच पावसानंतर नुकसान झालेले रस्ते, बंधारे, वीज वाहिन्या दुरुस्ती कामासाठीसुद्धा या निधीचा उपयोग करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.



सह्याद्री अतिथीगृहात राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते.राज्य आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले, पूर रेषा केवळ खूण म्हणून न ओळखता पूर रेषेच्या आत अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी. यासाठीचे सर्व्हेक्षण करताना अचूकतेसाठी उपग्रहाद्वारे मॅपिंग करावे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा. कोकण आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत घेण्यात येत असलेल्या भूमिगत वीज वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळामधले आसरे बांधणे, दरडप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजनांची आणि वीज अटकावची कामे गतीने करावीत.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात आगामी कालावधीत शिवराज्याभिषेक सोहळा, बकरी ईद, वटसावित्री पौर्णिमा, गुरुगोविंदसिंग जयंती आदी सण, उत्सवात शहरातील मिरवणुका व विविध कार्यक्रम आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१६ जुन २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. १६ जुन २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा



करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## शिवराज्याभिषेक सोहळा-२०२५ करिता जड-अवजड वाहनांकरिता वाहतुक बंदी आदेश जारी

**रायगड । प्रतिनिधी**

श्री शिवराज्याभिषेक सोहळा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून दि.०५ जून रोजी सायं.४.०० ते दि.०६ जून २०२५ रोजी रात्रौ १०.०० वाजेपर्यतच्या कालावधीमध्ये मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाकणफाटा नागोठणे ते कशेडी पर्यत तसेच माणगांव-निजामपुर मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, माणगांव ढालघरफाटा मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, महाड नातेखिंड मार्गे पाचाड ते रायगड किल्ला या मार्गावरील होणारी सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतुक बंदी अधिसूचना जारी केली आहे. श्री शिवराज्याभिषेक सोहळा-२०२५ हा कार्यक्रम दि.०५ जून व दि.०६ जून रोजी किल्ले रायगड येथे साजरा होणार आह. या कार्यक्रमासाठी रायगड, पुणे, सातारा, कोल्हापुर, मुंबई वैगेरे ठिकाणाहून लाखोंच्या संख्येने श्री शिवभक्त हे आपआपली वाहने घेवून येत असतात. तसेच सदर



कार्यक्रमाकरीता आयोजकांच्या सामानाची वाहने देखील मोठ्या प्रमाणात श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याकरीता येत असतात. या सोहळ्याकरीता येणारे शिवभक्त हे रायगड किल्ला येथे माणगांव-निजामपुर मार्गे पाचाड ते रायगड किल्ला, माणगांव ढालघरफाटा मार्गे पाचाड ते रायगड किल्ला,महाड नातेखिंड मार्गे पाचाड ते रायगड किल्ला असे जाण्याचे एकूण तीन मार्ग आहेत. या मार्गावरून शिवभक्त हे आपआपल्या वाहनाने मोठ्या संख्येने येत असतात. तसेच शासकीय यंत्रणा यांच्या वाहनांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात असते. सदर शिवभक्तांची वाहने ही मुंबई-गोवा महामार्गावरून कशेडी घाट ते महाड, तसेच वाकणफाटा-नागोठणे-कोलाड-माणगांव-महाड या महामार्गावरून येत असतात. त्यातच मुंबई-गोवा महामार्गावरून मोठ्या प्रमाणात जड-अवजड वाहनांची देखील प्रचंड प्रमाणात वाहतूक होत असते अशावेळी अपघात, वाहतूक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कार्यकमाच्या वेळी कोठेही वाहतुक कोंडी निर्माण होवू नये व श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याकरीता येणारे शिवभक्त यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी जिल्हाधिकारी जावळे वाहतूक बंदी जाहीर केली आहे.

# बांधिलकी जोपासत राजेंद्र घोडकेंनी शासकीय सेवा केली : नंदकिशोर मुंदडा

## राजेंद्र घोडके हे समाजभान जपणारे व्यक्तीमत्व आहे - राजकिशोर मोदी ; राजेंद्र घोडके यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम मंडळ, लातूर येथे प्रमुख आरेखक या पदावर कार्यरत असलेले राजेंद्र राधाकिसन घोडके हे शासकीय सेवेमध्ये तब्बल ३९ वर्षे सेवा करून ते नुकतेच शुक्रवार, दि.३० मे २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

सेमिनार हॉल क्र.१ इंजिनिअरिंग कॉलेज येथे रविवार, दि.०१ जुन २०२५ रोजी आयोजित सेवापुर्ती सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ.विवेकानंद राजमान्य हे होते. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, आणि डॉ.सिद्धेश्वर बिराजदार (विभागप्रमुख, मेडिसीन, स्वाराती रूग्णालय, अंबाजोगाई.), रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे अध्यक्ष कल्याण काळे, सत्कारमूर्ती राजेंद्र राधाकिसन घोडके व सौ.शिवशाला राजेंद्र घोडके या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कॉ.अजय बुरांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी सेवापूर्ती सन्मान सोहळा आयोजित करण्यामागील भुमिका विशद केली. तर संयोजकांकडून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी राजेंद्र राधाकिसन घोडके व सौ.शिवशाला राजेंद्र घोडके यांचा एकत्रित सन्मान करण्यात आला. सत्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, भव्य पुष्पहार, पुष्पगुच्छ, शाल, फेटा, साडी चोळी, भरपेहराव



असे होते. तसेच याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, काळवटी साठवण तलाव गुड मॉर्निंग ग्रुप, विविध सामाजिक व राजकीय संघटना, मित्र परिवार आणि नातेवाईक यांच्याकडून ही त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. यावेळी अमरनाथ खुर्पे (माजलगाव), ज्ञानेश्वर पवार, सौ.शिवशाला राजेंद्र घोडके यांनी समायोचित मनोगत व्यक्त केले. डॉ.सिद्धेश्वर बिराजदार यांनी राजेंद्र घोडके हे सामाजिक जाण व भान जपणारे व्यक्तीमत्व असल्याचे सांगितले. तर ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी सांगितले की, आज मोबाईलच्या जमान्यात माणूस माणसांपासून दूर जात आहे. अशा काळात घोडके यांनी विविध क्षेत्रातील उत्कृष्ट माणसं जोडली. अडचणीच्या वेळी अनेकांना मदत केली. आपण समाजाचे स्वास्थ्य चांगले ठेवले तर सर्वांच्या जगण्याला अस्तित्व प्राप्त होईल. माणसं जोडण्याचा आदर्श गुण आपण राजेंद्र घोडके यांच्याकडून घेतला पाहिजे असे श्री.मुंदडा यांनी सांगितले. तर माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, राजेंद्र घोडके यांचा मित्र परिवार मोठा आहे. त्यांनी माणसांचा गोतावळा जमवला व टिकवला आहे. एक सामाजिक कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. विविध सामाजिक संघटनेशी निगडित व धम्म चळवळीत ते योगदान देत आहेत. आपल्या माय, मातीशी व नात्यांशी त्यांची नाळ कायम जोडलेली आहे. राजेंद्र घोडके हे एक समाजभान जपणारे व्यक्ती आहेत असे मोदी म्हणाले. सत्काराला उत्तर देताना राजेंद्र घोडके यांनी आपणांस कोरोनापासून डॉ.सिध्देश्वर बिराजदार यांनी वाचविले. त्यामुळे माझे हे आयुष्य बोनस लाईफ आहे. माझे आई-वडील हे धर्मराज आहेत. मी देखील कुटुंब, समाज, नातेवाईक यांची जाणीव ठेवून काम केले. शालेय जीवनापासून मी चळवळीत सहभागी आहे. तसेच सामाजिक जाणीव ठेवून काम करीत आहे. सुरूवातीपासून मला सर्वांचे सहकार्य लाभले त्याबद्दल घोडके यांनी सभागृहात उपस्थित मान्यवरांसह सर्वांचे आभार मानले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.विवेकानंद राजमान्य म्हणाले की, समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून घोडके यांनी काम केले. ते निष्कलंक, मोठ्या मनाचे, शिलवान व्यक्ती आहेत. सतत हसतमुख चेहरा ठेवून ते आपले आयुष्य जगले. राजेंद्र घोडके हे एक आदर्श व्यक्तीमत्व आहेत असे गौरवोद्गार डॉ.राजमान्य यांनी काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश तौर व सर नागेश जोंधळे यांनी केले. तर सन्मानपत्राचे वाचन करून उपस्थितांचे आभार गणेश तौर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे धनराज सोळंकी, अविनाश मुडेगावकर, भिमाशंकर शिंदे काळवटी तलाव गुड मॉर्निंग ग्रुपचे डॉ.दत्ता मसने, रमेश देशमुख, मनोहर केदार, पत्रकार जगन सरवदे, आकाश वेडे, चंद्रकांत बनसोडे, मुजाहेद साजीद, सचिन वाघमारे, प्रा गौतम गायकवाड शशिकांत चव्हाण, रामलिंग मुंडे, चंद्रकांत देशमुख, विश्वनाथ बुरांडे यांच्यासह अंबाजोगाई येथील मित्र परिवार यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमास अंबाजोगाई, माजलगाव आणि लातूर येथील विविध क्षेत्रातील मान्यवरांची, मित्र परिवार, नातेवाईक यांची उपस्थिती होती.

CMYK

दैनिक **मराठवाडा पत्र**

● epaper.marathwadapatra.com

गुरुवार, दि.०५ जून २०२५ पान ४

## विविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार भरती

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ बीडमध्ये सन २०२५- २६ या सत्रात विविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार निवडीची प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. केंद्र शासनाने तयार केलेल्या एम.आय.एस. पोर्टलवर apprenticeship india.org या वेबसाईटवर शिकाऊ उमेदवार भरतीची कार्यवाही प्रथम ऑफलाईन पध्दतीने व नंतर ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. शिकाऊ उमेदवार निवडीबाबत विविध व्यवसायात भरावयाच्या जागा, विद्यावेतन, शैक्षणिक अर्हता, वय, शुल्क, शेवटची तारीख इत्यादी अटी व शर्तीच्या माहितीसाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या वरील वेबसाईटवर किंवा विभागीय कार्यालय, राष्ट्रीय परिवहन बीड- ४३११२२, दुरध्वनी क्र. ०२४४२-२२२५८० येथे संपर्क साधवा, असे विभाग नियंत्रक, राज्य परिवहन बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# जिल्हा वाहतुक शाखेचा वैद्यनाथाच्या नगरीत नियम मोडणाऱ्या वाहनधारकांना दणका

### ९५ केसेस व ६६ हजार रुपयाचा ठोठावला दंड; चोरीचे वाहन संभाजीनगर पोलीस स्टेशनला जमा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शन आणि जिल्हा वाहतुक शाखेची कटाक्ष नजर यामुळे वाहन चोरी करणार्या आरोपींचे चांगलेच धाबे दणाणले आहे. अशातच परळी वै.येथे वर्षभरापुर्वी चोरीला गेलेले वाहन तपासणीदरम्यान चोरीचे आढळून आल्याने संबंधित आरोपीस वाहनासह पकडून कारवाई करण्यात आली



त्यामुळे नागरिकांतून पोलीसांच्या काम ांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे

याबाबत माहिती अशी की, बीड जिल्ह्यात सद्यस्थितीला पोलीस अधिक्षक नवनीत सर यांच्या म ार्गदर्शनाखाली गुन्हेगारांचे कंबरडे मोडले असून यापुर्वी २४ तासाच्या आत गुन्हेगारांवर भारतीय न्याय संहिते अंतर्गत कायदेशीर कारवाई केल्याच्या घटना घडल्याने गुन्हेगारांना चांगलाच वचक बसला आहे त्यामुळे बीड जिल्हा पोलीसांवर जनतेचा विश्वास वाढलेला दिसत आहे अशातच आज रोजी जिल्हा वाहतुक शाखेने मोटार वाहन कायद्या अंतर्गत परळी येथे संभाजीनगर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत अप्पर पोलीस अधिक्षक सचिन यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्यासोबत पोलीस हवालदार शांतीलाल, पोलीस हवालदार विष्णु, पोलीस नाईक आदिनाथ, पोलीस अंमलदार विश्वजित, चालक हवालदार संतोष व संभाजीनगरचे पोलीस अंम लदार दिलीप यांच्या सहकार्याने दुपारी ११ ते १ च्या दरम्यान परळी वै.

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड बायपास रोडवर दुचाकीला जोरदार धडक

### राजपिंपरी येथील पती पत्नी जागीच ठार !

**बीड । प्रतिनिधी**

लग्न समारंभ आटपून घराकडे दुचाकी वर निघालेल्या पती-पत्नीवर बीड बायपास रोडवर काळाने घाला घातला. एका चार चाकी कारने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने रस्त्यावर पडून दोघा पती-पत्नीचे जागेवरच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बीड बायपास रोडवर बुधवारी सायंकाळी पाचच्या दरम्यान घडली. ▶▶ उर्वरित पान २ वर



## रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांना ग्राहक आयोग बीड यांचे नुकसान भरपाई देण्याचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

मशिनचे पार्ट चोरीस गेल्याबाबत विमा नुकसान भरपाई देण्यास नकार दिल्यामुळे रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांना ग्राहक आयोग बीड यांचे ५ लाख ६४ हजार रुपये रक्कम नुकसान भरपाई तसेच तक्रारीचा खर्च म ानसिक व शारिरीक त्रासापोटी ५० हजार रुपये देण्याचे आदेश दिल्याने सदरील विमा कंपनीला आयोगाचा चांगलाच दणका बसला आहे.

याबाबत माहिती अशी की, अंबिका रिचार्ज ॲन्ड सोल्युशन्स चे मालक यांनी आपल्या होरीझॉन्टल डायरेक्शन ड्रिलिंग मशीनसाठी विमा घेतलेला होता व सदरील मशीनवर ॲक्सीस बँकेचे कर्ज घेतलेले होते सदरील मशीनम धील दि.१५ नोव्हेंबर २०२३ रोजी काही पार्ट्स व बॅटर्या चोरीला गेल्या त्याची एकूण किंमत ५ लाख ६४ हजार रुपये इतकी होती त्यावर तक्रारदार यांनी विमा कंपनीला विमा नुकसान भरपाई मागितली असता त्यांनी मशीनचे पार्ट्स विम्यामध्ये कव्हर होत नाहीत असे सांगून विमा फेटाळला. त्यामुळे तक्रारदार यांनी जिल्हा व सत्र न्यायालयातील ॲड.बी. डी.सारडा यांच्या मार्फत ग्राहक आयोग बीड येथे ग्राहक तक्रार क्रमांक २७४/२०२४ अन्वये

▶▶ उर्वरित पान २ वर

# रनविर पंडित यांची काकु नाना हॉस्पीटला भेट

### पत्रकार विश्वनाथ शरणांगत यांच्या मुलाच्या तबियतीची केली चौकशी यावेळी डॉ. आळणे यांनी केले रनविर पंडित यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हातील तरुण युकांचे खंदे समर्थक, नेते रनविर पंडित यांनी काकू नाना मेमोरीयल हॉस्पीटलं बीड येथे गेवराई तालुक्यातील व मौजे रामपुरी येथील रहिवाशी विश्वनाथ शरणांगत यांचा मुलगा तेजश शरणांगत हा १५ दिवसा पासुन हॉस्पीटल मध्ये ॲडमीट आसुन कोमात आहेत. तेजशची भेट

▶▶ उर्वरित पान २ वर



# शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांचा गोशाळेला चारा, वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा





### शिवसेना माजलगाव चा उपक्रम

**माजलगाव । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगावात शिवसेनेच्या वतीने गोशाळेला चारा आणि वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा केला आहे.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांना उदंड व निरोगी आयुष्य लाभावे यासाठी माजलगाव शिवसेनेच्या वतीने इतर वाई खर्चाला फाटा देऊन देवखेडा येथील गोशाळेला चारा देऊन व पुंनदगाव येथील श्री केदारेश्वर देवस्थानच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करून दिनांक ४ जून रोजी वाढदिवस साजरा करण्यात आला आहे यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले ▶▶ उर्वरित पान २ वर



*वडवणी पोलीस ठाण्याच्या नवनियुक्त प्रथम महिला झख श्रीमती वर्षा व्हगाडे-शिंदे मॅडम यांचे वडवणी नगरीत स्वागत करुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना दै. मराठवाडा पत्रचे तालुका प्रतिनिधी संभाजी लांडे पाटील दिसत आहेत.*

## महा-ई-सेवा केंद्राकडून विद्यार्थ्यांची लूट !

**बीड । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष सुरु झालेले आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेमध्ये विविध कागदपत्रे जमा करावी लागत आहेत जसे की. उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र व इतर शैक्षणिक कामाकरीता लागणारे विविध कागदपत्र जमा करावी लागत आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांना महा-ई-सेवा केंद्रामध्ये जावून त्या ठिकाणाहून कागदपत्रे आणावी लागत आहेत, मात्र या सर्व संधीचा फायदा घेत महा-ई-सेवा केंद्र मालक व इतर कर्मचारी वर्ग हा विद्यार्थ्यांकडून जास्तीची रक्कम घेत आहेत.



वरील प्रकरणाची योग्य ती सखोल चौकशी करावी व जे काही महा-ई-सेवा केंद्र चालक विद्यार्थ्यांकडून जास्तीची रक्कम वसुल करत आहेत त्यांच्याविरुद्ध योग्य ती कडक कार्यवाही करावी व विद्यार्थ्यांना न्याय मिळून द्यावा असे मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेचे सोमेश कदम यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

# उज्जोत प्रीमियर क्रिकेट लीग - 2025 स्पर्धेचा शानदार समारोप

### खेळाडू खेळामुळे होतो मानसिकदृष्ट्या कणखर: सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

उज्जोत क्रिकेट फाऊंडेशन व योगेश्वरी क्रिकेट अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचा शानदार समारोप झाला. विजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण नुकतेच योगेश्वरी कॉलेजच्या राजमाता जिजाऊ क्रीडांगणावर म ान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, योगेश्वरी महाविद्यालयाचे प्राचार्य मारूती कानिटकर, क्रीडा शिक्षक रमण



सोनवळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ. इंगोले यांनी कोणताही खेळ त्या खेळाडूला शारीरिकदृष्ट्या सक्षम तर बनवतोच शिवाय मानसिकदृष्ट्या कणखर बनवतो. खेळाडू हे आत्मविश्वासाने भरलेले असतात. त्यांच्यामध्ये खिलाडूवृत्ती सोबतच सहकार्य, प्रेम, एकसंघ राहण्याची वृत्ती आणि खेळाप्रती निष्ठा हे गुण आपोआप रूजले जातात त्यामुळे कोणताही खेळाडू हा जीवनामध्ये आपल्या ध्येयाच्या दिशेने जाण्यासाठी सक्षम असतो. खेळ हा त्या खेळाडूचा आत्मसन्मान असतो. सध्या विद्यार्थी मोबाईलवरच विविध खेळ खेळत असल्याने मैदानावर खेळाडूंची कमतरता भासत आहे. मोबाईलवरचे आभासी खेळ खेळल्याने शारीरिक व मानसिक कसरत होत नाही उलट मेंदूला विनाकारण ताण निर्माण होतो. खेळामुळे खेळाडूचे फक्त शारीरिक व मानसिक तंदुरूस्तीच नाही तर सामाजिकिकीकरणाची प्रक्रिया होत असल्याने खेळाडू हा समाजाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा महत्त्वाचा हिस्सा असतो असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी केले. प्राचार्य मारूती कानिटकर यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

